पीएच. डी.

संशोधन आराखडा

“नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत भूगोल विषयाच्या पीएच.डी. (विद्यावाचस्पती)
या पदवीकरिता सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रा.बाळासाहेब रघुनाथ चकोर
(एम.ए., एम.फिल)
क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे,
कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी ता.दिंडोरी जि.नाशिक

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने
उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसी
ता. जळकोट जि.लातूर (महाराष्ट्र)

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

मार्च २०१६

“नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्राचा भौगोलिक अभ्यास”

प्रस्तावना :

प्रदेश संकल्पना ही प्रादेशिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा साक्षात्कार मानला जातो. प्रदेश या मूळ संकल्पनेत प्राकृतिक आणि सांस्कृतिक घटकांची अंतर्गत समानता याचा समावेश होतो. प्राकृतिक रचनेत स्थान, भौगोलिक रचना, संसाधने, भौगोलिक वैशिष्ट्ये, हवामान, जलप्रणाली, मृदा, वनस्पती आणि सांस्कृतिक घटकात व्यापार व दळणवळण आणि संस्कृती या घटकाचा समावेश होतो. हे समान घटक असलेला भाग प्रदेश म्हणून ओळखला जातो.

प्रदेश हा लॅटीन भाषेतील शब्द आहे. प्रदेश म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावरील विविध आविष्कार होत. प्रदेश संकल्पनेमध्ये खालील तीन मुख्य बाबींचा समावेश होतो. पहिल्या घटकात मानवी वस्त्यांच्या प्रादेशिक व आर्थिक वैशिष्ट्यांचा सहसंबंध यांचा समावेश होतो. दुसऱ्या घटकात प्रदेशाच्या सभोवतालच्या परिसरातील काही बाजार केंद्राचे आणि नागरी केंद्राचे विश्लेषण केले जाते तर तिसऱ्या घटकात प्रशासकीय विभाग, राजकीय परिस्थिती आणि त्याद्वारे योजनांची होणारी अंमलबजावणी आणि त्यांचा सहसंबंध कसा आहे याचा अभ्यास केला गेला जातो.

प्रादेशिक नियोजनाचा सेवाकेंद्र म्हणून ग्रामीण वस्त्यांची निवड करणे व या सेवाकेंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करत असताना त्या वस्तीचे निवास स्थान, त्याचा आराखडा, त्यात होणारा बदल आणि त्याच्या श्रेणी स्तर यांचा अभ्यास केला जातो.

अभ्यासक्षेत्रातील विविध सेवाकेंद्राच्या सेवासुविधांचा आढावा घेणे, त्यात नागरी व ग्रामीण सेवा केंद्रांना प्रत्यक्ष भेटी देवून त्याचा अहवाल तयार करणे. सेवा केंद्राच्या अत्यावश्यक सेवांचा आढावा घेणे, सेवाकेंद्राच्या श्रेणी स्तरांची निवड करणे, त्यांची क्रयशक्ती अभ्यासणे, त्यांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे, श्रेणी पद्धतीची निश्चती करण्यासाठी विविध अभ्यास पद्धतीचा अवलंब करणे याचा अभ्यास केला जातो. सेवा केंद्र निश्चित केलेल्या वस्त्यांच्या श्रेणी तयार करुन त्यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी डेव्हिस एम.डब्ल्यू केंद्राच्या

श्रेणी पद्धतीचा अभ्यास केला आहे. त्यांच्या प्रसिद्ध श्रेणी पद्धतीचा अभ्यास करून आवश्यक त्या काढलेल्या निष्कर्षाच्या आधारे त्याचे काही गुण दोष सांगण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यात साध्या पद्धतीने चर्चा करून सेवा केंद्राचे वर्गीकरण करून मुख्य अभ्यास पद्धतीच्या आधारे चार गटात विभागणी करण्यात येणार आहे.

त्यात त्यांनी उच्च तंत्रज्ञानाच्या आधारे गुण दोषांचा अभ्यास करून प्रस्तुत संशोधनात सेवा केंद्राच्या विविध तंत्रज्ञानाच्या स्तराचा आणि पद्धतीचा वापर करून अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्र निश्चित केलेली आहेत. आवश्यक त्या विविध पद्धतीचा वापर अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राच्या अभ्यासाकरिता करण्यात येणार आहे.

अभ्यास क्षेत्र :

नाशिक जिल्ह्याचा विस्तार १९°.३५' ते २०°.५२' उत्तर अक्षांश आहे. रेखावृत्तीय विस्तार ७३°.१६' ते ७५°.१६' पूर्व रेखांश या भौगोलिक पट्यात वसलेला आहे. नाशिक जिल्ह्याच्या पुर्वेस-जळगांव, औरंगाबाद, दक्षिणेस-अहमदनगर, पश्चिमेस ठाणे जिल्हा व गुजरात राज्याचा काही भाग व उत्तरेस - धुळे जिल्हा व गुजरातचा काही भाग आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये नाशिक, पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, बागलाण, मालेगांव, चांदवड, नांदगाव, येवला, निफाड, सिन्नर, इगतपुरी, देवळा व त्र्यंबकेश्वर हे १५ तालुके आहेत. नाशिक जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १५५३० चौ.कि.मी. असून क्षेत्राच्या नाशिक जिल्हा महाराष्ट्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे. हे क्षेत्र राज्याच्या ५.०४ टक्के इतके आहे.

नाशिक समुद्रसपाटीपासून ६०० मीटर उंचीवर आहे. गोदावरी नदीचा उगम नाशिकपासून २४ कि.मी.त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी पर्वतावर झाला असून ती जुन्या निवासी भागातून शहराच्या उत्तर सीमेलगत वाहते. गोदावरी व्यतिरिक्त वैतरणा, भीमा, गिरणा, कश्यपी, दारणा इत्यादी महत्त्वाच्या नद्या नाशिकमधून वाहतात. ज्वालामुखीच्या उद्रेकापासून निर्माण झालेल्या दख्खन पठाराच्या पश्चिम काठावर नाशिक वसलेले आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ६१,०९०५२ इतकी आहे. लोकसंख्या घनतेचे प्रमाण ३२१.५६ प्रति चौरस कि.मी. इतके आहे. तर लिंग गुणोत्तर हे १.०७ असून साक्षरतेचे प्रमाण ८०.९६ टक्के इतके आहे.

अभ्यासाची उद्दिष्ट्ये :-

१) अभ्यास क्षेत्रातील प्राकृतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) शैक्षणिकदृष्ट्या (माध्यमिक शाळा), वैद्यकीय सुविधा (आरोग्य केंद्र), दळणवळण सुविधा (पोस्ट कार्यालय), व्यापार सुविधा (आठवडी बाजार) व किमान २००० लोकसंख्या या घटकांच्या आधारे सेवा केंद्र निश्चित करणे.

३) नाशिक जिल्ह्यातील मानवी विकासावर सेवा केंद्राचा होणारा परिणाम अभ्यासणे.

४) नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करणे.

४) अभ्यास क्षेत्रातील नवीन सेवा केंद्र (Proposed Service Centres) निश्चित करणे.

५) नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्राच्या अभिक्षेत्रीय प्रारूपाचे विश्लेषण करणे.

६) जिल्ह्यातील सेवा केंद्राची केंद्रीयता व श्रेणीस्तर अभ्यासणे.

७) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राच्या प्रभाव क्षेत्राचा अभ्यास करणे.

८) अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्रविषयक सुविधांची उपलब्धता व कमतरता असलेले क्षेत्र दर्शविणे.

गृहितके :

सदरील शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी खालील गृहितके लक्षात घेतलेली आहेत.

१) नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्रातील अंतर समान नसून त्यात असमानता आढळते.

२) उच्च दर्जाचे सेवा केंद्रे हे उच्च दर्जाच्या सेवे बरोबरच कमी प्रतिच्या सेवाही पुरवितात.

३) जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या एकूण सेवा केंद्रामध्ये खाजगी क्षेत्राचा वाटा फार मोठा आहे.

४) नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्रात विविध सेवा सुविधांची कमतरता आहे.

५) सेवा केंद्रावर भौगोलिक घटकांचा प्रभाव आहे.

आकडेवारी संकलन :-

या संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात येणार आहे. प्राथमिक स्वरुपाची आकडेवारी मिळविण्यासाठी विविध सेवा केंद्रांना भेटी देवून प्रश्नावलीच्या सहाय्याने आकडेवारी संकलित केली जाणार आहे. त्यासाठी मुलाखत तंत्राचा

वापर करण्यात आला आहे. दुय्यम स्वरुपाची आकडेवारी प्राप्त करण्यासाठी जिल्हा सामाजिक, आर्थिक समालोचन, जिल्हा गॅझेटिअर, जनगणना पुस्तिका, विविध संशोधन पत्रिका, सेवा केंद्राशी संबंधित मासिके, सेवा केंद्रे संचलनालय अहवाल व इंटरनेटचा आधार घेण्यात येणार आहे.

अभ्यास पध्दती :

प्रस्तूत शोधप्रबंधासाठी मिळविण्यात येणारी प्राथमिक व द्वितीयक माहितीचे विश्लेषण विविध तक्ते नकाशे व आलेखाच्या सहाय्याने करण्यात येणार आहे. त्यासाठी विविध सांख्यिकिय पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. कार्ल पिअरसन यांची सहसंबंध पद्धत प्रस्तुत संशोधनात वापरण्यात आलेली आहे. सेवा केंद्र व क्षेत्र, वस्त्या आणि लोकसंख्या यांचा सहसंबंध अभ्यासण्यात येणार आहे. त्याकरिता खालील सुत्राचा आधार घेण्यात येणार आहे.

$$r = \frac{\sum dxdy}{\sqrt{(\sum dx)^2 \times (\sum dy)^2}}$$

अभ्यास क्षेत्रातील सेवा केंद्राचे वितरण कशा प्रकारे झालेले आहे हे पाहण्यासाठी "निअरेस्ट नेबर" पध्दतीचा वापर केला जाणार आहे. यासाठी खालील सुत्राचा वापर करण्यात येणार आहे.

$$Rn = \frac{\text{Observed Mean Dis tan ce}}{\text{Expected Mean Dis tan ce}} \quad \text{or} \quad 0.5\sqrt{\frac{A}{N}}$$

खुलासा :-

RN = Randomities

A = Total Area

N = Total Number of Service Centers

सेवा केंद्र आणि क्षेत्र, वसाहती व लोकसंख्या यानुसार असलेले वितरण अभ्यासण्याकरिता प्रमाण विचलन काढण्यात येणार आहे. त्याकरिता खालील सूत्राचा वापर करण्यात येईल.

$$SD = \sqrt{\frac{\sum(x - x)^2}{N}}$$

जवळील शेजारी विश्लेषण करण्यासाठी परिस्थितीकीय शास्त्रज्ञ क्लार्क आणि इव्हन्स यांच्या खालील सूत्राचा वापर करणार आहे. सेवा केंद्राची केंद्रीयता काढण्यासाठी Location quotient method या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

$$C = \frac{t}{T} X100$$

खुलासा :

C = Score for any function 't'

t = One Unit of Function 't'

T = Total Number Functional Units of 't' in the area

सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र अभ्यासण्यासाठी विविध चार पद्धतींचा वापर प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे. त्यात जॅक्सन यांची सुधारीत पद्धत, व्ही.एल.एस. प्रकाश राव यांची सुधारीत पद्धत, सक्सेना यांची सुधारीत पद्धत आणि अनुभवाधिष्ठित पद्धत यांचा वापर करण्यात येणार आहे.

I) Jackson’s Modified Method

1) $$(\text{Influence area according to area} = \frac{\text{Total Area}}{\text{Total No. of Service Centre}}$$

2) $$(\text{Influence area according to villages} = \frac{\text{Total Villages}}{\text{Total No. of Service Centre}}$$

3) $$(\text{Influence area according to population} = \frac{\text{Population}}{\text{Total No. of Service Centre}}$$

II) V.L.S.Prakash Rao Method

$$D = \frac{T \times A}{U} / R = \frac{T \times A}{U}$$

Modified Method

$$SI = \frac{TC \times A}{U} / R = \frac{\sqrt{TC \times A}}{U}$$

III) सक्सेना यांचे प्रभावक्षेत्राचे सूत्र

$$\text{त्रिज्या} = \frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{सेवा केंद्राची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}$$

$$\text{सुधारीत सुत्र} \quad \text{त्रिज्या} = \sqrt{\frac{(\text{एकूण क्षेत्र}) \times (\text{सेवा केंद्राची एकूण लोकसंख्या})}{\text{संपूर्ण अभ्यास क्षेत्राची एकूण लोकसंख्या}}}$$

या शिवाय विविध भूगोल अभ्यासकांच्या पध्दती वापरुन सेवा केंद्राचे प्रभाव क्षेत्र काढण्याचा प्रयत्न करणार आहे.

अभ्यास विषयाची व क्षेत्राची निवड

१) प्रस्तुत अभ्यासाकरिता अभ्यास क्षेत्र म्हणून नाशिक जिल्हा निवडण्यात आला आहे. हा जिल्हा १५ तालुक्यात विभागला असून त्यास ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.

२) अभ्यास क्षेत्रात सेवा केंद्राच्या माध्यमाने पुरविल्या जाणाऱ्या विविध सेवा सुविधा पुरेशा नाहीत. त्यामुळे या क्षेत्राचा तितकासा विकास झाला नाही जिल्हयाच्या विकास नियोजनाकरिता हे अभ्यास क्षेत्र निवडले आहे.

३) या प्रदेशाची आर्थिक स्थिती ही शेतीवर आधारित आहे. त्यामुळे या अभ्यास क्षेत्रातील बरीचशी लोकसंख्या प्राथमिक (शेती) व्यवसायात गुंतलेली आहे.

४) या प्रदेशात रस्ते व रेल्वे वाहतुकीचा तितकासा विकास झालेला नाही आणि सेवा केंद्राच्या वितरणावर या वाहतुक व दळणवळण सुविधांचा मुख्य प्रभाव असतो.

५) नाशिक जिल्हयातील सेवा केंद्राचा अभ्यास आजपर्यंत एकाही भूगोल अभ्यासकाने किंवा इतर अभ्यासकाने केलेला नाही.

अभ्यासाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधन कार्य हे विद्यावाचस्पती (Ph.D.) पदवीकरिता सादर केले जाणार आहे. प्रदेशाच्या विकासात सेवा केंद्राचे योगदान मोठे असते. त्याकरिता सेवा केंद्राचा अभ्यास करण्यात येणार आहे. या अभ्यासात खालील काही मर्यादा येतात.

१)	प्रस्तुत अभ्यास क्षेत्रात काही नवीन तालुक्याची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे तहसीलनिहाय आकडेवारी वेळेवर उपलब्ध होत नाही.

२)	नवीन तालुक्याच्या वस्तीनिहाय नकाशा संबंधित कार्यालयाकडून वेळेवर उपलब्ध होऊ शकत नाही.

३)	सेवा केंद्राच्या अभ्यासाकरिता वेळेचे बंधन असल्यामुळे हे संशोधनाचे काम वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे.

४)	नाशिक जिल्ह्यातील सेवा केंद्राविषयीची आवश्यक ती माहिती व साहित्य उपलब्ध नाही.

५)	मानवी विकासात सेवा केंद्राबरोबरच लोकसंख्येचाही अभ्यास केलेला आहे.

साहित्य पुनरावलोकन

गोपाळकृष्ण आणि चंदना यांनी ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास करत असताना रेशन दुकान, शाळा, पोस्ट कार्यालय, बँक, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र इ. चा आधार घेऊन ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास केलेला आहे. ‘आऊटर हिमालयातील सेवा केंद्र पद्धती’ हे पुस्तक सेवा केंद्राच्या अभ्यासासाठी संपादीत केलेले आहे. त्यात ग्रामीण व नागरी सेवा केंद्र याचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

प्रा.सिंग यांनी ग्रामीण सेवा केंद्राचा अभ्यास करत असताना प्रशासकीय सेवा, संदेशवहन सेवा, व्यापार सेवा इ. चा आधार घेऊन सेवा केंद्राचा अभ्यास केलेला आहे.

डेव्हीस डब्ल्यू.के.डी. यांनी ‘सेवा केंद्राची श्रेणी एक समीक्षक अध्ययन’ या संशोधन निबंधात ग्रामीण सेवा केंद्राचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

बर्शी एच.ई. (Bracy H.E.) यांनी ग्रामीण सेवांचा अभ्यास केलेला आहे. बुपीदर झुत्सी (Bupinder Zutshi) यांनी काश्मीर खोऱ्यातील सभोवतालच्या प्रदेश क्षेत्रावर सेवा केंद्राच्या होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केलेला आहे. यात त्यांनी सेवा केंद्राची ओळख, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय सुविधांचा अभ्यास केलेला आहे. अनेक घटकांना मूल्य देऊन त्याआधारे त्यांनी सेवा केंद्राच्या सभोवतालच्या प्रदेशावर असलेला प्रभाव अभ्यासला आहे.

गुहा बी (Guha B) हुगळी जिल्ह्यातील ग्रामीण सेवा केंद्र यांचा अभ्यास केला आहे. त्यात त्यांनी प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्र व डाक कार्यालयाचा अभ्यास केलेला आहे.

मिश्रा बी.एन. (Mishra B.N.) यांनी जौनपूर जिल्ह्यातील सेवा केंद्र आणि नियोजन यांचा विशेष अभ्यास केलेला आहे.

कारुथेर डब्ल्यू.आय. (Carruther W.I.) यांनी इंग्लंड आणि रेल्समधील सेवा वर्गीकरणाचा अभ्यास केलेला आहे. तसेच बृहद लंडन मधील सेवा केंद्र यांचाही अभ्यास केलेला आहे.

डेव्हीस डब्ल्यू.के.डी. (Davies WKD) यांनी सेवा केंद्राची श्रेणी यांचा संक्षिप्त अहवाल याचा अभ्यास केलेला आहे.

घारपूरे व्ही.टी. आणि पवार सी.टी. यांनी पंचगंगा नदीखोऱ्यातील कृषी सेवा केंद्राची केंद्रीयतता आणि श्रेणी स्तर यांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्याचबरोबर पंचगंगा खोऱ्यातील कृषी सेवा केंद्राच्या प्रभाव क्षेत्राचे सिमांकन याचाही अभ्यास केलेला आहे.

गुडलुंड एस. (Gundlund S.) स्वित्झलंडमधील बस सेवा यांचा अभ्यास केलेला आहे.

गोने एस.एच. यांनी परभणी जिल्ह्याच्या विकास नियोजनात सेवा केंद्राचे योगदान याचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक आराखडा

१.१ प्रस्तावना

१.२ विपणन भूगोलाचा अर्थ

१.३ विपणन भूगोलाच्या व्याख्या

१.४ विपणन भूगोलाचा विकास

१.५ विकास संकल्पना

१.६ प्रादेशिक विकासावर परिणाम करणारे घटक

१.७ भारतीय विपणन भूगोलाचा विकास

१.८ सेवा केंद्राची संकल्पना

१.९ सेवा केंद्रावर परिणाम करणारे घटक

१.१० प्राथमिक सेवा केंद्र

१.११ गृहितके

१.१२ अभ्यासाची उद्दिष्ट्ये

१.१३ आधार सामुग्रीचे संकलन

१.१४ अभ्यास पद्धती

१.१५ अभ्यासाच्या मर्यादा

१.१६ साहित्याचे पुनरावलोकन

१.१७ प्रकरण मांडणी

प्रकरण दुसरे - नाशिक जिल्ह्यातील प्राकृतिक व सांस्कृतिक घटकांचा आढावा

२.१ प्रस्तावना

२.२ अभ्यास क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी

२.३ स्थान व विस्तार

२.४ भूपृष्ठरचना

२.५ नदीप्रणाली

२.६ हवामान

२.७ मृदा

२.८ वनस्पती

२.९ लोकसंख्या

२.१० वसाहत

२.११ कृषी, पीके व पिकपद्धती

२.१२ जलसिंचन

२.१३ उद्योगधंदे

२.१४ रस्ते व वाहतूक व्यवस्था

प्रकरण तिसरे- सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय वितरण

३.१ प्रस्तावना

३.२ तालुकानिहाय क्षेत्रफळ, ग्रामीण वस्त्या व लोकसंख्येनुसार, सेवा केंद्राचे गुणोत्तर

३.३ सहसंबंध शहरापासून विविध अंतरावर असलेल्या सेवा केंद्राचे निअरेस्ट नेबर रँडम स्केल

३.४ तहसीलनिहाय सेवा केंद्राचे वितरण

३.५ सेवा केंद्रापासून ग्रामीण वसाहतीचे अंतरानुसार तालुकानिहाय वितरण

प्रकरण चौथे - सेवा केंद्राची वाढ व विकास

४.१ प्रस्तावना

४.२ तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

४.३ तालुकानिहाय विविध सेवा केंद्राच्या लोकसंख्येतील वाढ

४.४ तालुकानिहाय सेवा केंद्रात झालेली वाढ

४.५ तालुकानिहाय सेवा केंद्र

४.६ तालुकानिहाय लोकसंख्येत झालेली वाढ

प्रकरण पाचवे - सेवा केंद्राची केंद्रीयता आणि पदानुक्रम

५.१ प्रस्तावना

५.२ विविध सेवा केंद्राची केंद्रीयता संकल्पना

५.३ सेवा केंद्राची केंद्रीयता

५.४ केंद्रीयततेचे अभिक्षेत्रीय वितरण

५.५ श्रेणी स्तर व सेवा केंद्राची पदानुक्रम संकल्पना

५.६ श्रेणी स्तराचे प्रादेशिक वितरण

प्रकरण सहावे - सेवा केंद्राचे प्रभावक्षेत्र

६.१ प्रस्तावना

६.२ सेवा केंद्राच्या विकासाचा स्तर

६.३ सेवा केंद्राच्या प्रभावक्षेत्राचे सैद्धांतिक व अनुभवधिष्ठीत विश्लेषण

६.४ जॅक्सन, व्ही.एल.एस.प्रकाशराव व सक्सेना यांनी वापरलेल्या अभ्यास पद्धती

प्रकरण सातवे - सेवा केंद्राचे अभिक्षेत्रीय संघटन

७.१ प्रस्तावना

७.२ सेवा केंद्राचा विकास स्तर

७.३ सेवा केंद्राची प्रादेशिक विविधता

७.४ सेवा केंद्राचे वाहतूक व दळणवळण सुविधांचा आढावा

७.५ नियोजित सेवा केंद्रे

प्रकरण आठवे - निष्कर्ष व शिफारशी

८.१ प्रस्तावना

८.२ निष्कर्ष

८.३ शिफारशी

८.४ उपाययोजना

संदर्भ

1. Bracy, H.E. (1953): “Towns and Rural Service Centres”, Institute of British Geographers, Vol.49, Pp.95-105.
2. Carruthers, W.I.,(1957): “Classification of Service Centres in England and Wales”, *Geog. Jr.*, Vol.XXII, Pp.371-85.
3. Davies, W.K.D. (1966): “The Ranking of Service Centres : A Critical Review”, *Transaction Institute of British Geographers*, Vol.XL, Pp.51.
4. Davies, W.K.D. (1967): “Centrality and the Central Place Hierarchy”, Urban Studies, 4, Pp.61-79
5. Funnell, D.C.(1978): ‘The Role of Small Service Centres in Regional and Rural Development : With Special Reference to Eastern Africa’, in A. Gilbert (ed.) Development Planning and Spatial Structure (Chichester, 1978), P.89.

6. Guha, B. (1967): "The Rural Service Centres of Hoogly District", Geographical Review of India, 29 (4).
7. Gone, S.H. (2008) 'A Study of Geographical Analysis of Market Centres in Parbhani District', Unpublished Thesis, S.R.T.M. University, Nanded
8. Gone, S.H. (2013) 'Role of Service Centres in Development Planning of Parbhani District', Unpublished Minor Research Project, S.R.T.M.U. Nanded
9. Gone S.H. (2015) 'Spatial Organization in Market Centres in Parbhani District', Unpublished Minor Research Project, UGC (WRO), Pune.
10. Jayaswal, S.N. (1962): "Sachendi – A Study on a Rural Service Centre", Geographical Review of India" 24 (1), Pp.46-52.
11. Kaloko, F.R. (1972): 'A Methodology for identification of service centre in rural areas'
12. Misra, B.N. (1980): 'The Spatial Pattern of Service Centres in Mirzapur District, U.P.', Unpublished M.Phil thesis, University of Allahabad, Allahabad.
13. Misra, K.K. (1987): "Service Centre Strategy in the Development Planning of Harnipur District", U.P. IJRS, Calcutta, Vol.19, No.1
14. Tiwari, R.C. (1980): "Spatial Organization of Service Centres in Lower Ganga-Yamuna Doab", *National Geographers,* 15 (2), Pp.103-124.
15. Wanmali, S. (1987): *Geography of a rural service system in India*, B.R. Publishing Corporation, New Delhi.

Websites

1. www.Maharashtra state data bank Govt. of Maharashtra.
2. www.india.gov.in
3. http://mahades.maharashtra.gov.in
4. www.nashik.ac.in
5. www.mahaarogya.com

संशोधक
प्रा.बाळासाहेब रघुनाथ चकोर

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.सदानंद हरिबा गोने